महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

विषय :-फेब्रुवारी –मार्च २०२५ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ. १२ वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांचा प्रस्तावाबाबत...

प्रकटन

फेब्रुवारी–मार्च २०२५ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना तसेच एन.सी.सी., स्काऊट गाईड मधील विद्यार्थ्यांना शासन निर्णयानुसार सवलतीचे बाढीव गुण देण्यात येतात.

शासन निर्णयानुसार जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडून क्रीडा प्रस्ताव तसेच एन.सी.सी., स्काऊट गाईड इत्यादी प्रस्ताव शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून दरवर्षी विभागीय मंडळाकडे दि. ३० एप्रिल पर्यंत सादर केले जातात. तथापि शैक्षणिक वर्ष २०२४–२०२५ या वर्षात माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) या परीक्षा नेहमीपेक्षा १० दिवस आधी आयोजित करण्यात आल्या असून सदर परीक्षांचा निकाल दि. १५ मे २०२५ पर्यंत जाहीर करणे मंडळाचा मानस आहे. त्यामुळे फेब्रुवारी–मार्च २०२५ परीक्षेतील खेळाडू विद्यार्थ्यांचे प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी दि. १५ एप्रिल २०२५ पर्यंत संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने पाठवावयाचे आहेत.

तसेच एन.सी.सी., स्काऊट गाईड चे प्रस्ताव शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी विभागीय मंडळाकडे प्रचलित पध्दतीने दि. १५ एप्रिल २०२५ पर्यंत पाठवावयाचे आहेत.

तरी याबाबत सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी, सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये मुख्याध्यापक/प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी, पालक, व सर्व संबंधित घटकांनी उपरोक्त बाबींची नोंद घेऊन त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

पुणे–४११ ००४.
दिनांक–०६/०२/२०२५

(डॉ. माधुरी सावरकर)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे–०४.

क्र.मुंविमं/माध्य.परीक्षा/
वाशी, नवी मुंबई-४००७०३.
दिनांक-०६/ ०२ /२०२५

प्रति,
मुख्याध्यापक/ प्राचार्य
मुंबई विभागीय कार्यक्षेत्रातील
सर्व मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महावि
मुंबई /बृन्हमुंबई /ठाणे /पालघर / रायगड जिल्हे

उपरोक्त पत्रानुसार मुख्याध्यापकांनी आपल्या स्तरावर नोंद घेवून त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

(ज्योत्स्ना शिंदे–पवार)
विभागीय सचिव (प्र.)
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई ४०० ७०३.

प्रतिः-
मुख्याध्यापक / प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा.

प्रत योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषितः-

1) मा. शिक्षण उपसंचालक, मुंबई.
२) शिक्षणाधिकारी(माध्य), ठाणे/रायगड/पालघर जिल्हा
३) शिक्षण निरीक्षक, पश्चिम/दक्षिण/उत्तर विभाग, मुंबई.
४) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, डहाणू/शहापूर/जव्हार/पेण.
यांनी आपल्या अधिपत्याखालील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांना परिपत्रक निदर्शनास आणावे.

Scanned with OKEN Scanner